Vipassana Research Institute, Dhamma Giri, Igatpuri
MITRA Upakaram
MIND IN TRAINING FOR RIGHT AWARENESS

Office: 1st Floor, Jaganath Bhathkar Marg, BMC School, Nr. Shirodkar BMC Market, Parel, Mumbai-12
Tel: +91 22 2351 6196 Email: mitraupakaram@gmail.com | Web: www.mitraupakaram.org

दिनांक 15/07/2026

अत्यंत महत्वाचे.

प्रति,
माननीय शिक्षणाधिकारी ( माध्यमिक)
जिल्हा परिषद
बीड.

विषय : माहे जुलै २०२६ च्या केंद्रस्तरिय शिक्षण परिषदेपूर्वी केंद्र प्रमुख/अधिकाऱ्यांचे मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण आयोजन करणे बाबत.

संदर्भ : १) जा.क्र.राशैसंप्रपम/कला व क्रीडा/मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/ दिनांक २९ जून २०२६.
२) जा.क्र.आशिका/स्विस/मित्र उपक्रम/२०१९-२०२०/४८५६ दिनांक ८ ऑगस्ट २०१९

महोदय,

कृपया वरील संदर्भीय परिपत्रक पहावे (प्रत सोबत जोडली आहे). यानुसार माहे जुलै 2026 च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत. नाशिक जिल्ह्यात धम्मगिरी विपश्यना केंद्र इगतपुरी येथे स्थित आहे.या केंद्रावर नियमितपणे मागील अनेक वर्षांपासून दहा दिवसीय निवासी विपश्यना शिबिरांचे आयोजित केले जाते. येथे स्थानिक तसेच इतर लोक सुद्धा लाभ घेतात.

केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुख तसेच गट शिक्षण अधिकारी मार्फत शिक्षकांचे मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनांचे प्रशिक्षण घेणे अपेक्षित आहे. आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्रप्रमुख तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे जेणेकरून ते प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण घेऊ शकतील. यासाठी आपल्या सोयीनुसार योग्य त्या ठिकाणी केंद्रप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण सहकार्य करून यांचे प्रशिक्षण पूर्ण करू. कृपया आपण याबाबत तातडीचे आदेश निर्गमित करावे ही विनंती.

धन्यवाद.

15-07-26
आवक लिपीक
शिक्षण विभाग(माध्य.),जि.प.बीड

आपला कृपाभिलाषी,
प्रकाश सुरेश बनसोडे
9890236089
ललिता प्रकाश बनसोडे
8484036089.

| | | |
|---|---|---|
| | # शिक्षण विभाग<br>जिल्हा परिषद,बीड | |

फोन 02442-222205 ई-मेलआयडी rmsabeed@gmail.com

जा.क्र.शिविप्रा/कावि-/ 000000 /2026 दिनांक. / / 2026

क्र = 3767 10 JUL 2026

प्रति

१.अध्यक्ष सचिव सर्व शिक्षण संस्था जिल्हा बीड

२.मुख्याध्यापक सर्व जिल्हा परिषद व अनुदानित अंशतः अनुदानित प्राथमिक /माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा जिल्हा परिषद बीड

विषय-विशेष संक्षिप्त पुनरीक्षण(SIR) कार्यक्रम -२०२६ अंतर्गत बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकांना इतर कामकाज न सोपविणे बाबत

संदर्भ -१. मा . शिक्षण संचालक (प्राथमिक )महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा क /प्राशीश /विसपु/ टे -८०३/ संकीर्ण /दिनांक ा:०६.जुलै २०२६

२. मा .शिक्षण संचालक (माध्यमिक 'महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा .क्र क्र .शिसंमा -२६ /म.के.अ /निवडणूक /२००४०२८ दि .७ जुलै २०२६

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की मा. भारत निवडणुक आयोगामार्फत विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम (SIR )-२०२६ राबविण्यात येत असून, दिनांक ३०/०६/२०२६ ते २९/०७/२०२६ या कालावधीत बी एल ओ म्हणून नियुक्त शिक्षकांकडून मतदार पडताळणी, घरभेटी ,Enumeration Forms ( EF ) भरणे, माहिती संकलित करून डिजिटायजेशन करणे ही कामे करण्यात येणार आहेत .

१.विशेष सखोल पुनरीक्षण (SIR )कार्यक्रमाच्या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी एल ओ) म्हणून नियुक्त शिक्षकांच्या अध्यापनाचे नियोजन करताना त्यांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमीत कमी ठेवाव्यात व त्या प्राधान्याने सलग ठेवून शक्यतो शाळा सकाळच्या सत्रामध्ये भरविण्याचे नियोजन दिनांक ३०/०७/२०२६ पर्यंत करण्यात यावे. जेणेकरून संबंधित शिक्षकांना त्यांचे शैक्षणिक कार्य सलग पूर्ण करून उर्वरित वेळेत (बी एल ओ ) म्हणून नियुक्त करण्यात आलेली जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडता येईल .

२.ज्या शिक्षकांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ ) म्हणून नियुक्ती करण्यात आलेली नाही, अशा शिक्षकांनी आवश्यकतेनुसार बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकांना शैक्षणिक व संबंधित कामकाजामध्ये सहकार्य करावे तसेच शाळा प्रमुखांनी अशा प्रकारे अंतर्गत कामाचे नियोजन करावे की बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकावर अतिरिक्त कामाचा ताण पडणार नाही

३.बीएलओ म्हणून नियुक्त असलेल्या शिक्षकांच्या तासिका इतर शिक्षकांना देण्याचे शक्यतो नियोजन करावे .

४. मा .सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर काम Non Teaching वेळेतपूर्ण करणे आवश्यक आहे .

तरी आपल्या शिक्षण संस्थेअंतर्गत/गटसाधन केंद्रांतर्गत शाळेतील बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकांना सदर कालावधीत कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण, बैठका, शासकीय योजना, निवडणुकी व्यतिरिक्त इतर प्रशासकीय

Scanned with OKEN Scanner

अथवा अतिरिक्त कामकाज देण्यात येऊ नये संबंधित बीएलओ यांना SIR-२०२६ चे काम वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात व सहकार्य करावे. शालेय तासिकांचे नियोजन बीएलओ यांच्या कामात अडथळा येणार नाही असे करावे सदर सूचना अत्यंत प्राधान्याने अमलात आणाव्यात.

| | | | |
|---|---|---|---|
| (प्रियाराणी पाटील) | (जयश्री चव्हाण) | (जितीन रहमान) | (विवेक जॉन्सन) |
| शिक्षणाधिकारी( मा.) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | मुख्य कार्यकारीअधिकारी | जिल्हाधिकारी तथा |
| जिल्हा परिषद बीड | जिल्हा परिषद बीड | जिल्हा परिषद बीड | जिल्हा निवडणूक अधिकारी,बीड |

प्रतिलिपी : १.शिक्षण उपसंचालक साहेब शिक्षण उपसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर

२.सर्व गटशिक्षणाधिकारी विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख विशेष शिक्षकआपल्या क्षेत्रातील शाळेमध्ये बीएलओ बाबत सदर पत्राची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करावी.

३.अधीक्षक वेतन पथक प्राथमिक माध्यमिक जिल्हा परिषद बीड सदर पत्र सर्व मुख्याध्यापकांना देऊन त्याची पोहोच तात्काळ सादर करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| -स्वा- | -स्वा- | -स्वा- | स्वा |
| (प्रियाराणी पाटील) | (जयश्री चव्हाण) | (जितीन रहमान) | (विवेक जॉन्सन) |
| शिक्षणाधिकारी( मा.) | शिक्षणाधिकारी (प्राथ.) | मुख्य कार्यकारीअधिकारी | जिल्हाधिकारी तथा |
| जिल्हा परिषद बीड | जिल्हा परिषद बीड | जिल्हा परिषद बीड | जिल्हा निवडणूक अधिकारी बीड |

Scanned with OKEN Scanner